# जपानच्या क्योटो सान्यो विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिटयूटला भेट

**ठाणे (वार्ताहर) :** भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे स्वरूप जपानी विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात अनुभवता यावे या उद्देशाने दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान जपानच्या क्योटो सान्यो विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात येते. विद्या प्रसारक मंडळ, ठाणे आणि क्योटो सान्यो विद्यापीठ, जपान यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक विनिमय कार्यक्रमांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या शैक्षणिक सहलीचे हे यंदाचे पाचवे वर्ष आहे. १५ जपानी विद्यार्थी व त्यांचे मार्गदर्शक आणि शिक्षक डॉ. कियोकुनी शिगा यांचे गेल्या आठवड्यातच आगमन झाले आहे. विद्याप्रसारक मंडळाच्या ज्ञानद्वीप विद्यासंकुलामधील १४ दिवसांच्या वास्तव्यात डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे या विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या उपक्रमांची दिनचर्या भल्या पहाटे योगसाधनेने सरू होते. यामध्ये त्यांना प्राथमिक आसने आणि श्वसन तंत्र शिकविले जाते की, ज्यामुळे त्यांच्या ऊर्जा पातळीमध्ये वाढ होईल. या योगवर्गानंतर न्याहारी आणि पुढे हिंदी भाषेचे प्राथमिक धडे तसेच इंग्रजी संभाषण कौशल्य आदी सत्रांचे आयोजन केले जाते.

दैनिक उपक्रमांव्यतिरिक्त ठाणे शहर, मुंबई शहर भेट आणि नाशिक येथे विशेष शैक्षणिक सहलीचे देखील आयोजन करण्यात आले. या सहली दरम्यान त्यांनी बुद्धविहार, दादासाहेब फाळके स्मारक, पांडुलेणी गुहा, कपिलेश्वर मंदिर, सीता गुहा, काळाराम मंदिर इत्यादी स्थळांना भेटीचा कार्यक्रम आखला होता.

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (व्हीम्स) चे संचालक डॉ. नितीन जोशी या प्रसंगी म्हणाले की, या जपानी पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्याची आणि या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना त्यांच्या विचारांची, कल्पनांची देवाण घेवाण करण्यासाठी उत्तेजन देण्याची संधी मिळणे हा आमचा सन्मान असल्याचे सांगितले. जपानचे डॉ. कियोकुनी शिगा या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. कियोकुनी शिगा हे बौद्ध धर्म आणि भारतीय संस्कृतीचे अभ्यासक आणि प्राध्यापक असून त्यांनी या शैक्षणिक सहली दरम्यान मिळालेला सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले आहे.